

'डिस्लेक्सिया' म्हणजे अक्षरमंदता. सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांमध्ये आढळणाऱ्या या दोषावर मंजुला पूजा श्रॉफ यांचं कार्य अमर्याद आहे. अशा अक्षरमंद विद्यार्थ्यांसाठी अहमदाबादमध्ये 'प्रेरणा' संस्थेची स्थापना करून त्यांच्यासाठी त्यांनी नवं क्षितिजच खुलं केलं आहे.

संध्या धुरी

# परिचय एका शिक्षणाग्रहीचा

'शिक्षण म्हणजे नुसतं ज्ञानसंपादन नव्हे तर ज्ञानार्जन हेही शिक्षणाचं एक अंग आहे. आणि त्या दृष्टीनं त्याचं महत्त्वही आहे पण हे अंतिम ध्येय नव्हे. खरं तर शिक्षण व्यापक असून मनुष्याच्या सर्वांगीण वाढीचा यात समावेश होतो. ज्ञान हे कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतीला आवश्यक आहेच. पण ह्या ज्ञानाचा उपयोग मनुष्याच्या आणि देशाच्या कामी होईल तेव्हाच त्याची सार्थकता झाली असं समजावं. शिक्षण क्षेत्राचं हेच मोठं ध्येय असलं पाहिजे आणि ते त्रिकालाबाधित राहावं'- लेडी अर्विन यांच्या या वाक्याची प्रचीती मंजुला पूजा श्रॉफ यांना भेटल्यावर त्यांचं शिक्षण क्षेत्रातलं काम पाहिल्यावर येते. लहानपणापासूनच शिक्षणाविषयीची तळमळ असणाऱ्या श्रॉफ बाईंचं शालेय शिक्षण ओरिसातून पूर्ण झालं. घरचं वातावरण शिक्षणाग्रही असल्यामुळे शिकण्याची तशी त्यांना लहानपणापासूनच गोडी होती. शाळेत शिकत असताना बरोबरीच्या होतकरू गरीब विद्यार्थ्यांची शिक्षण घेताना होणारी फरपट त्यांना सहन व्हायची नाही. अशा मुलांसाठी काहीतरी करावं असं भरपूर वाटायचं, पण वय लहान असल्यामुळे कुठेच कही व्हायचं नाही. पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी दिल्लीला आल्यावर बरोबरच्या प्रादेशिक भाषा माध्यमातून शिक्षण घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन वातावरणात टिकाव धरून ठेवण्याच्या वृत्तीला दाद द्यावीशी त्यांना वाटायची. राज्यशास्त्रातून पदवी शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांच्या असं लक्षात आलं की, व्यवस्थापनाचा अभ्यास आपल्या उत्तुंग निर्धाराला बळकटी देईल; त्यासाठी लग्नानंतर गुजरातला आल्यावर 'आयआयएम' मधून व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. काही वर्षे त्यांनी उद्योजक म्हणून काम केलंसुद्धा. पण त्यांचं



मन त्यात काही रुळलं नाही. मुलं आणि मुलांचं शिक्षण हेच त्यांचं खरं विश्व होतं. शेवटी त्यांनी उद्योजकतेमधून बाहेर येऊन प्रादेशिक भाषा माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा काढायची ठरवली. त्यातूनच गुजरात राज्यात 'दिल्ली पब्लिक स्कूल' नावाची शाळा सुरू झाली. या शाळेचं वैशिष्ट्य म्हणजे ही शाळा दिल्ली बोर्डाशी संलग्न आहेच पण या शाळेतून विद्यार्थ्यांना इयत्ता बारावीपर्यंतचं शिक्षण दिलं जातं.

२००१ साली झालेल्या गुजरात भूकंपात बहुसंख्य घरं उद्ध्वस्त झाली. कित्येक मुलं अनाथ झाली. अशा मुलांच्या पुढील शिक्षणाची वाताहत होऊ नये म्हणून मंजुला पूजा श्रॉफ यांनी विसामो किडस् नावाची शाळा काढली. ह्या शाळेतून गुजरात भूकंपात अनाथ झालेली मुलं शिकतच आहेत. त्याच बरोबरीने ज्या मुलांना घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे शिक्षण घेता येत नाही अशा मुलांना शिक्षण दिलं जातं. विसामो किडस् या शाळेत विद्यार्थ्यांच्या राहण्यासाठी खास वसतिगृहाची सोय करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या देखरेखीसाठी, त्यांना सांभाळण्यासाठी गुरुमातांची सोय करण्यात आली आहे. विसामो किडस् आणि दिल्ली पब्लिक स्कूल यांची स्थापना अहमदाबादमध्ये केल्यावर त्यांना असं आढळून आलं की, त्यांच्या काही विद्यार्थ्यांना कितीही शिकवलं तरी त्यांच्या डोक्यात कोणतीच गोष्ट शिरत नाही. तसंच ही मुलं एका विषयात नापास होतात. प्रत्येक गोष्ट त्यांना साभिनय समजावून सांगावी लागते. याविषयी अधिक माहिती देताना त्या म्हणाल्या, ''या अशा विद्यार्थ्यांमध्ये एक मुलगी होती. जिला गणितातली फ्रॅक्शन पद्धती कळत नव्हती. आता या मुलीला ही गणितातली पद्धत कशी समजावून सांगावी हा गहन प्रश्न आम्हाला पडलेला होता. शेवटी खूप शक्कल लढवली. हातात एक संत्र घेतलं मी सोललं. त्या संत्र्याच्या फोडी वेगवेगळ्या केल्या तेव्हा त्या मुलीला कळलं की, एखादी गोष्ट निर्माण होताना तिच्यातल्या बारीक-बारीक गोष्टी एकत्र होऊनच ती निर्माण केली जाते.''

अशा विद्यार्थ्यांच्या केसेस मंजुला पूजा श्रॉफ यांनी मानसशास्त्रज्ञांकडे पाठवल्या. तज्ज्ञांच्या अधिक परीक्षणांती विद्यार्थ्यांमध्ये आढळणाऱ्या दोषाला डिस्लेक्सिया म्हणजेच अक्षरमंदता हे नाव दिलं. अक्षरमंदता हा दोष असणारे विद्यार्थी वाचन, लेखन आणि बोलणं यांपैकी कोणत्याही एका गोष्टीत बरेच कच्चे असतात. पण कुठल्यातरी एका गोष्टीवर त्यांचं खूप प्रभुत्व असतं. म्हणजे या विद्यार्थ्यांमधला तो 'टॅलेंट' ओळखून फक्त त्याला वाव मिळायला हवा, असं या मानसिक दोषाबद्दल मंजुला श्रॉफ यांना कळल्यावर त्यांनी या अशा विद्यार्थ्यांसाठी 'प्रेरणा' नावाची शाळा सुरू केली आहे. ही शाळा अहमदाबादला असून या शाळेतल्या विद्यार्थ्यांच्या इयत्तांची विभागणी पुढील ग्रुपप्रमाणे केलेली आहे. द ज्युनियर ब्रिजमध्ये ग्रेड लेव्हल म्हणजे इयत्ता तिसरी आणि चौथीचे विद्यार्थी येतात. इंटरमीडियट ब्रिजमध्ये पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांच्या समावेश करण्यात आला आहे. सिनियर ब्रिजमध्ये सातवी आणि आठवीचे विद्यार्थी येतात. अॅडव्हान्स ब्रिजमध्ये नववी आणि दहावीचे विद्यार्थी येतात. तर सीनियर अॅडव्हान्स ग्रुपमध्ये इयत्ता अकरावी आणि बारावीचे विद्यार्थी येतात. या विद्यार्थ्यांना दहावीची परीक्षा सीबीएस्सी बोर्डामार्फत देता येते. या विद्यार्थ्यांना सीबीएस्सी बोर्डाने विषयांच्या निवडीकरिता बरंच स्वातंत्र्य दिलं आहे. तसंच जे अक्षरमंद विद्यार्थी लिहिताना सतत शुद्धलेखनाच्या चुका करतात, त्यांच्यासाठी परीक्षेत खास रायटर ठेवण्याची विशेष सोयही करण्यात आली आहे. प्रेरणामध्ये अक्षरमंद विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जातो. जसं अक्षरओळख, शब्दभांडार कसं वाढवायचं, वाचलेली गोष्ट लक्षात कशी ठेवायची, जलद गतीने कसं वाचायचं, गणितं कशी सोडवायची, अंक लक्षात ठेवण्याची ताकद कशी जोपासायची यांसारख्या अनेक बारीकसारीक गोष्टी शिकवल्या जातात. प्रेरणामध्ये फक्त गुजरात राज्यातलेच अक्षरमंद विद्यार्थी शिकत नाहीत, तर भारतातल्या इतर राज्यांतले अक्षरमंद विद्यार्थी शिकायला येतात. सध्या प्रेरणामध्ये भारतातल्या इतर राज्यातले एकूण ८० अक्षरमंद विद्यार्थी शिकत आहेत. या प्रत्येक विद्यार्थ्यांचं अभिरुचीक्षेत्र भिन्न असून ते त्या क्षेत्रांत उत्तुंग स्थानावर असल्याची कल्पना मंजुला पूजा श्रॉफ यांनी दिली. पैकी १७ वर्षीय ब्रह्मज्योत सिंग या विद्यार्थ्याने हायड्रोजन इंधनाचा शोध लावून एक मोटारसायकल आणि मारुती ८०० पळवली. त्याच्या या संशोधनास स्पेन सरकारची मान्यता मिळाली असून सध्या ब्रह्मज्योत स्पेनमध्ये हायड्रोजन इंधनावर मोठ्या प्रमाणावर संशोधन करत आहे. तृष्णा जीनवाला ही मुलगी खूप चुकते पण गझल छान रचते. तर जिग्नशा गांधी जी कोलकात्याची अक्षरमंद विद्यार्थिनी गणितं करताना सतत चुका करायची पण आता तर ती गुजरातमधल्या मुख्य प्रवाहातल्या महाविद्यालयांतून भौतिकशास्त्र हा विषय घेऊन शिकत आहे. अशा या प्रेरणा महाविद्यालयात भोपाळ, इस्राईलमधूनही विद्यार्थी शिकण्यासाठी येतात.

मंजुला पूजा श्रॉफ यांचे अक्षरमंद तसंच तळागाळातील होतकरू गरीब विद्यार्थ्यांसाठीचे प्रयत्न पाहून एक गोष्ट लक्षात येते की, शिक्षण हे साध्य नसून साधन आहे. कोणासही ते देताना त्याच्या पुढील आयुष्यक्रमाला उपयुक्त आणि सहाय्यकारी होईल असंच दिलं पाहिजे. कारण शिक्षणामुळे बुद्धीला हवंतसं वळण लावता येऊन मनाचा संकुचितपणा नाहीसा करून ते विस्तृत, विकसित आणि उदात्त करण्याचं ते एक साधन आहे. हेच मंजुला पूजा श्रॉफ यांनी विद्यार्थ्यांच्या बाबतीत केलं आहे. त्यामुळेच त्या प्रादेशिक भाषा माध्यमातल्या शिक्षण क्षेत्रातला 'ध्रुवतारा' ठरल्या आहेत.

dhuri.sandhya@gmail.com